## पार्श्वभूमी

२०१३ मधे महाराष्ट्रातील साहसी उपक्रमांसाठी सरकारी नियमावली तयार करण्याचे काम सुरू होते तेव्हा सुरक्षा मार्गदर्शक सूचनांची गरज सर्वप्रथम जाणवली.
महाराष्ट्र शासनाने ATOAI चा सल्ला घेण्याचे ठरवले. ATOAI ह्या संस्थेने २०१८ मध्ये त्यांच्या सुरक्षा मार्गदर्शक सूचनां प्रकाशित केल्या, आणि मॅकने महाराष्ट्रासाठी विशिष्ट सूचना तयार करण्यासाठी त्यांचा आधार म्हणून वापर केला आहे.
सुरक्षा मार्गदर्शक सूचना आणि नियम यात फरक आहे (उदा. “चालकाने गाडी चालवताना रस्त्यावर लक्ष ठेवावे” - ही सुरक्षा मार्गदर्शक सूचना आहे. पण “लाल सिग्नल असताना गाडी थांबवावी” - हा नियम आहे सेफ्टी गाइडलाइन या दगडावरची रेघ नाहीत. यात सतत सुधारणा होत राहतील

## सूचना

ह्या सूचना विशेषकरून “आयोजित साहसी उपक्रमासाठी” आहेत - जिथे सहभागींच्या सुरक्षेची जबाबदारी आयोजकांवर असते
ह्या सूचनांचा भाग १ म्हणजे “सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली” - संस्थेच्या व्यवस्थापकांसाठी / क्लबच्या वरिष्ठ सभासदांसाठी
भाग ५ म्हणजे प्रारूप नमुने - हे वापरून प्रत्येक संस्थेला स्वत:च्या SOP (Standard Operating Procedure) तयार करता येतील
पदभ्रमणासाठी आपल्या मुलांना पाठवणाऱ्या पालकांसाठी पण सुरक्षा सूचनांचा अंतर्भाव केलेला आहे.
ह्या सूचना तयार करताना महाराष्ट्रातील परिस्थितींचा विचार केला आहे. म्हणूनच काही नवीन गाइडलाइनचा अंतर्भाव केला आहे ज्या महाराष्ट्राशी निगडित आहेत. (उदा. सुळक्यावर चढाई मोहीम किंवा वॉटरफॉल रॅपलिंग)

## सावधानतेचा इशारा

सहभागींसाठी - कोणताही साहसी उपक्रम योग्य देखरेख आणि मार्गदर्शनाखालीच करावा. केवळ संबंधित सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वे वाचून कोणत्याही साहसी उपक्रमाचा प्रयत्न करू नका.
आयोजकांसाठी - नवशिक्यांसाठी कोणताही साहसी उपक्रम आयोजित करण्यापूर्वी प्रशिक्षण आणि अनुभव या दोन्ही गोष्टी आवश्यक असतात. ह्या दस्तऐवजाच्या नावातच सगळे आले आहे - ह्या “सूचना” आहेत. वेगवेगळ्या जागांवर अशा पैलूंवर विशेष लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता असू शकते ज्यांचा सुरक्षा सूनांमधे आंतर्भाव केलेला नसेल. (उदाहरण - एखाद्या जागेजवळ मधमाश्यांची पोळी असू शकतात आणि म्हणूनच तिथे अतिरिक्त सावधगिरी ची आवश्यकता असेल. या सर्वच गोष्टी कोणत्याही सुरक्षा मार्गदर्शक सूचनांमधे समाविष्ट केल्या जाऊ शकत नाहीत.)
या सूचनांचा वापर सावधपणे करा.